**"ऑगस्ट २०२०" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती ...**

## (क) शासन निर्णय / अधिसूचना

- दिनांक १३ ऑगस्ट २०२० च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत सन २०२०-२१ करिता वनामती, नागपूर या प्रशिक्षण संस्थेस एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता ३६ सहायक अनुदाने (वेतन) या उद्दिष्टाखाली रु.७०.९४ लाख तसेच ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) उद्दिष्टाखाली रु.६८६.०७ लाख अशी एकूण रु.७५७.०१ लाख इतकी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर करण्यात आली आहे. त्यापैकी आता ३६ सहायक अनुदाने (वेतन) या उद्दिष्टाखाली माहे ऑगस्ट २०२० करिता रु.७.०९४ लाख इतकी रक्कम वितरित करण्यात आली आहे.
- दिनांक १७ ऑगस्ट २०२० च्या शासन परिपत्रकान्वये भूतपूर्व दुय्यम सेवा निवडमंडळाच्या कार्यकक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) गट-ब (अराजपत्रित) व गट-क पदे सरळसेवेने भरताना महापरीक्षा पोर्टल पद्धतीत बदल करुन सुधारित परीक्षा पद्धतीचा वापर करण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.
- दिनांक २४ ऑगस्ट २०२० च्या शासन आदेशान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-६ अंतर्गत १८ परिविक्षाधीन कक्ष अधिकारी गट-ब संवर्गातील उमेदवारांना खातेनिहाय जिल्हा संलग्नता प्रशिक्षण कार्यक्रम तसेच या प्रशिक्षणासाठी दिनांक २ सप्टेंबर २०२० ३ ऑक्टोबर २०२१ या कालावधीकरिता मंत्रालयीन विभागात तात्पुरत्या स्वरुपात पदस्थापना देण्यात आली आहे.
- दिनांक २४ ऑगस्ट २०२० च्या शासन आदेशान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-५ अंतर्गत १२ परिविक्षाधीन कक्ष अधिकारी गट-ब संवर्गातील उमेदवारांना खातेनिहाय जिल्हा संलग्नता प्रशिक्षण कार्यक्रम तसेच या प्रशिक्षणासाठी दिनांक २ सप्टेंबर २०२० ३ ऑक्टोबर २०२१ या कालावधीकरिता मंत्रालयीन विभागात तात्पुरत्या स्वरुपात पदस्थापना देण्यात आली आहे.

## (ख) नियुक्ती / पदोन्नती / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक

- ३० लघुटंकलेखकाना निम्नश्रेणी लघुटंकलेखक संवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे.
- १७ निम्नश्रेणी लघुटंकलेखकांना उच्चश्रेणी लघुटंकलेखक संवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे.
- ४१ सहायक कक्ष अधिकाऱ्यांना कक्ष अधिकारी संवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे.
- ५१ लिपिक-टंकलेखकांना सहायक कक्ष अधिकारी संवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे.
- २ निम्नश्रेणी लघुलेखकांना उच्चश्रेणी लघुलेखक संवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे.
- ११ शिपायांना लिपिक-टंकलेखक संवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे.
- एका उपसचिवांच्या प्रपत्र बढतीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

## (ग) बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल / कार्यमुक्त

- भारतीय प्रशासन सेवेतील २६ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- १ उपसचिव, २ अवर सचिव, १ कक्ष अधिकारी अशा ४ अधिकाऱ्यांची बदली करण्यात आली आहे.
- २ उपसचिव, ८ कक्ष अधिकारी अशा १० अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्यात आली आहे.
- १ सहसचिव, २ उपसचिव, ४ अवर सचिव, २ कक्ष अधिकारी अशा ९ अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.
- एका अवर सचिवाचे प्रत्यावर्तन करण्यात आले आहे.

## (घ) ज्येष्ठतासूची

- दिनांक १९ ऑगस्ट २०२० च्या शासन परिपत्रकान्वये गट-क मधील लिपिक-टंकलेखक पदावर पदोन्नतीसाठी अर्हताप्राप्त करणाऱ्या मंत्रालयीन विभागातील गट-ड मधील कर्मचाऱ्यांची दिनांक २१ फेब्रवारी २०१८ रोजीची अंतरिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

- दिनांक १९ ऑगस्ट २०२० च्या शासन परिपत्रकान्वये गट-क मधील लिपिक-टंकलेखक पदावर पदोन्नतीसाठी अर्हताप्राप्त करणाऱ्या मंत्रालयीन विभागातील गट-ड मधील कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०१९ रोजीची अंतरिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक १९ ऑगस्ट २०२० च्या शासन परिपत्रकान्वये गट-क मधील लिपिक-टंकलेखक पदावर पदोन्नतीसाठी अर्हताप्राप्त करणाऱ्या मंत्रालयीन विभागातील गट-ड मधील कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०२० रोजीची अंतरिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

*****